८१७८
१०।१०।२०१८

M.T. KULKARNI
9420891940 & 9767655008

विश्वकर्मा बिल्डवेल कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार

१. विश्वकर्मा भिला शार्दूल

२. अमोल सुभाष गवळी

**मिळकत विकसित करणेचा करारनामा**

**(डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट)**

[redacted] पावती Original/Duplicate

Monday,October 10 ,2016 नोंदणी क्र. :39म

5:23 PM Regn. 39M

---

पावती क्रं.: 9586 दिनांक 10/10/2016

गावाचे नाव: मखमलाबाद

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: नसन3-8198-2016

दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा

सादर करणाऱ्याचे नाव: विश्वकर्मा बिल्डर्स कन्स्ट्रक्शन भागीदारी संस्था तर्फे भागीदार1.श्री. विश्वकर्मा मिला शार्दूल - -

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 660.00 |
| पृष्ठांची संख्या: 33 | |
| एकूण: | रु 30660.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे 5:42 PM ह्या वेळेस मिळेल.

Joint Sub Registrar Nashik3

सह. दुय्यम निबंधक वर्ग -२
नाशिक - ३.

---

बाजार मुल्य: रु.6436000 /-

मोबदला रु.14661000/-

भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 733500/-

1) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH005083364201617E दिनांक: 10/10/2016
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 660/-

मूळदस्त परत केला

Index-2( सूची - २ )

10/10/2016

सूची क्र.2

दुय्यम निबंधक : सह दु.नि. नाशिक 3
दस्त क्रमांक : 8198/2016
नोदणी :
Regn:63m

गावाचे नाव : 1) मखमलाबाद

| | |
|---|---|
| (1)विलेखाचा प्रकार | विकसनकरारनामा |
| (2)मोबदला | 14661000 |
| (3) बाजारभाव(भाडेपटटयाच्या बाबतितपटटाकार आकारणी देतो की पटटेदार ते नमुद करावे) | 6436000 |
| (4) भू-मापन,पोटहिस्सा व घरक्रमांक (असल्यास) | 1) पालिकेचे नाव:नाशिक म.न.पा. इतर वर्णन :, इतर माहिती: मौजे मखमलाबाद सर्व्हे नंबर 8/2अ/19/20/21/22/23 यांमी भुखंड क्रमांक 19 ते 23 यासी एकुण क्षेत्र 1021.50 चौ.मी. या मिळकतीमधील मुळ मालकांस दयावयाचे 47 टक्के बांधकामाचे वाटीव क्षेत्र 715.90 चौ.मी. व त्या अनुषंगाने असलेले प्लोटचे क्षेत्र 457.42 चौ.मी. अधिक रिफंडेबल डिपॉझिटसह( ( Survey Number : 8/2अ/19/20/21/22/23 ; Plot Number : 19 ते 23 ; ) ) |
| (5) क्षेत्रफळ | 1) 1021.50 चौ.मीटर |
| (6)आकारणी किंवा जुडी देण्यात असेल तेव्हा | |
| (7) दस्तऐवज करुन देणा-या/लिहून ठेवणा-या पक्षकाराचे नाव किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता. | 1): नाव:-1.श्री. दशरथ मधुकर काशिमरे - - वय:-45; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: 4610 काशिमरे भुवन, हनुमानवाडी पंचवटी नाशिक , ब्लॉक नं. -, रोड नं: -, महाराष्ट्र, नाम्:ईक. पिन कोड:-422003 पॅन नं:-AZRPK1163E<br>2): नाव:-2 .श्री. अरुण मधुकर काशिमरे - - वय:-37; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: 4610 काशिमरे भुवन, हनुमानवाडी पंचवटी नाशिक , ब्लॉक नं: -, रोड नं: -, महाराष्ट्र, नाम्:ईक. पिन कोड:-422003 पॅन नं:-AHUPK3434B |
| (8)दस्तऐवज करुन घेणा-या पक्षकाराचे व किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता | 1): नाव:-विश्वकर्मा बिल्डर्स कन्स्ट्रक्शन भागीदारी संस्था तर्फे भागीदार 1.श्री विश्वकर्मा मिस्त्री भाईल - - वय:-48; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: 6 पुष्पक अपार्टमेंट, गोपाळ पार्क समोर, जुनी पंडीत कॉलनी, नाशिक , ब्लॉक नं: -, रोड नं: -, महाराष्ट्र, नाम्:ईक. पिन कोड:-422002 पॅन नं:-AANFV1516F<br>2): नाव:-विश्वकर्मा बिल्डर्स कन्स्ट्रक्शन भागीदारी संस्था तर्फे भागीदार 2.श्री. अमोल सुभाष गवळी - - वय:-30; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: 6 पुष्पक अपार्टमेंट, गोपाळ पार्क समोर, जुनी पंडीत कॉलनी, नाशिक , ब्लॉक नं: -, रोड नं: -, महाराष्ट्र, नाम्:ईक. पिन कोड:-422002 पॅन नं:-AANFV1516F |
| (9) दस्तऐवज करुन दिल्याचा दिनांक | 10/10/2016 |
| (10)दस्त नोंदणी केल्याचा दिनांक | 10/10/2016 |
| (11)अनुक्रमांक,खंड व पृष्ठ | 8198/2016 |
| (12)बाजारभावाप्रमाणे मुद्रांक शुल्क | 733500 |
| (13)बाजारभावाप्रमाणे नोंदणी शुल्क | 30000 |
| (14)शेरा | |

सूची क्र. II
नोंदणी नंतरची प्रथम प्रत
अस्सल बरहुकूम नक्कल

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक-3.

मुल्यांकनासाठी विचारात घेतलेला तपशील:-:

मुद्रांक शुल्क आकारताना निवडलेला अनुच्छेद :- : (i) within the limits of any Municipal Corporation or any Cantonment area annexed to it.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-3
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक ३

१९८९
२०१६

CHALLAN
MTR Form Number-4

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| GRN | MH005083364201617E | BARCODE | | Date 10/10/2016-13:14:21 | Form ID 25.1 |

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | Payer Details | |
| Type of Payment | Stamp Duty<br>Registration Fee | TAX ID (If Any) | |
| | | PAN No. (If Applicable) | AANFV1516F |
| Office Name | NSK3_NASHIK 3 JOINT SUB REGISTRAR | Full Name | VISHWAKARMA BUILDWELL CONSTRUCTION |
| Location | NASHIK | | |
| Year | 2016-2017 One Time | Flat/Block No. | 8/2/B PLOT NO. 19 TO 23 AREA 1021. |
| Account Head Details | Amount in Rs. | Premises/Building | 50 SQ.MTRS. |
| 0030046401 Stamp Duty | 733000.00 | Road/Street | MAKHMALABAD NASHIK |
| 0030063301 Registration Fee | 30000.00 | Area/Locality | MAKHMALABAD NASHIK |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 2 2 0 0 3 |
| | | Remarks (If Any) | PAN2=AZRPK1163E~SecondParty[illegible] RATH MADHUKAR K[illegible] |
| | | Amount In Words | Seven Lakh Sixty Three Thousand Five Hundred Rupees Only |
| Total | 763000.00 | | |
| Payment Details | BANK OF MAHARASHTRA | FOR USE IN RECEIVING BANK | |
| Cheque-DD Details | | Bank CIN / REF No. | 02300042016101025297 / 384013173 |
| Cheque/DD No | | Date | 10/10/2016-13:14:35 |
| Name of Bank | | Bank-Branch | BANK OF MAHARASHTRA |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll |

Mobile No. : Not Available

नसन - ३
दस्त क्र. १९८९ /२०१६
१ — ३०

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 * NASIK-3 *
दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक ३

| नसन-३ |
| --- |
| दस्त क्र. ८५८८ /२०१६ |
| २३ |



सदर मिळकतीत टी.डी.आर.चा वापर करणार नाही
मुल्यांकन विभाग क्रमांक १४.६ मखमलाबाद
मुखंडाचा भाव रूपये ६,३००/- प्रति चौ.मी.
भुखंडाचे एकूण क्षेत्र १०२१.५० चौ.मी.
मुळ मालकांचे भुखंडाचे मुल्यांकन रूपये ६४,३६,०००/-
भुखंडाचा भाव रूपये ६,३००/- प्रति चौ.मी.
मुळ मालकांस दयावयाचे भुखंड क्षेत्र ४५७.४२ चौ.मी.
भुखंडाचे मुल्यांकन रूपये- २८,८२,०००/-
बांधकामाचा भाव रूपये २०,०००/- प्रति चौ.मी.
मुळ मालकांस दयावयाचे बांधकामाचे बांधीव क्षेत्र ७१५.९० चौ.मी.
मुळ मालकाच्या बांधकामाचे मुल्यांकन रूपये १,४३,१८,०००/-
मुळ मालकांस रिफंडेबल सिक्युरिटी डिपॉझिट चोविस महिने वरील व्याजाची रक्कम रूपये ४८,०००/-

| | |
| --- | --- |
| मुल्यांकन रूपये- | १,७२,४८,००० X ८५% |
| एकुण मुल्यांकन रूपये | १,४६,६१,०००/- |
| मुद्रांक रूपये | ७,३३,५००/- |
| नोंदणी फी रूपये | ३०,०००/- |

## *मिळकत विकसित करणेचा करारनामा*
## *(डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट)*

मिळकत विकसित करणेचा करारनामा (डेव्हलपमेंट अॅग्रीमेंट)आज दिनांक १० माहे ऑक्टोबर इसवी सन २०१६ ते दिवशी नासिक मुक्कामी-

लिहून घेणार
विश्वकर्मा बिल्डवेल कन्स्ट्रक्शन भागीदारी संस्था तर्फे भागीदार
पॅन कार्ड नंबर एएएनएफव्ही १५१६एफ
१.श्री.विश्वकर्मा मिला शार्दूल , उ.व. ४८, व्यवसाय- व्यापार
२.श्री. अमोल सुभाष गवळी,उ.व. ३० व्यवसाय-व्यापार
दोघे रा. ६, पुष्पक अपार्टमेंट, गोपाळपार्क समोर, जुनी पंडित कॉलनी, नाशिक ४२२००२
यांसी
लिहून देणार
१. श्री. दशरथ मधुकर काश्मिरे पॅन कार्ड नंबर एझेडआरपीके११६२ह
उ.व. ४५, व्यवसाय शेती

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class 2 NASIK-3

नसन-३
दस्त क्र. ८७८५ /२०१९
३ — ३३



२. श्री. श्याम मधुकर काश्मिरे पॅन कार्ड नंबर एएचयुपीके३४३४बी उ.व. ३७, व्यवसाय शेती व व्यापार दोघे रा.घर नंबर ४६१० काश्मिरे भुवन हनुमानवाडी, पंचवटी, नासिक ४२२००३

कारणे मिळकत विकसित करणेचा करारनामा लिहून देतात की,

१. मिळकतीचे वर्णन- तुकडी जिल्हा नासिक पोट तुकडी तालूका नासिक पैकी नासिक महानगरपालीका हद्दीतील नाजकम कक्षे बाहेरील मौजे मखमलाबाद गांवचे शिवारातील खाली नमूद केलेल्या भुखंडाच्या मिळकती

अ.सर्व्हे नंबर ८/२ब/१९ यांसी भुखंड क्रमांक १९ यांसी क्षेत्र १९८.०० चौ.मी यांसी बिनशेती आकार रूपये ११९.०० पैसे यांसी चतु:सिमा -

पुर्वेस - भुखंड क्रमांक २८ ची मिळकत
पश्चिमेस - ७.५० मिटर रूंदीचा कॉलनी रोड
दक्षिणेस - भुखंड क्रमांक २० ची मिळकत
उत्तरेस - ओपन स्पेस (मोकळी जागा )

ब.सर्व्हे नंबर ८/२ब/२० यांसी भुखंड क्रमांक २० यांसी क्षेत्र १९८.०० चौ.मी यांसी बिनशेती आकार रूपये ११९.०० पैसे यांसी चतु:सिमा -

पुर्वेस - भुखंड क्रमांक २७ ची मिळकत
पश्चिमेस - ७.५० मिटर रूंदीचा कॉलनी रोड
दक्षिणेस - भुखंड क्रमांक २१ ची मिळकत
उत्तरेस - भुखंड क्रमांक १९ ची मिळकत

क.सर्व्हे नंबर ८/२ब/२१ यांसी भुखंड क्रमांक २१ यांसी क्षेत्र १९८.०० चौ.मी यांसी बिनशेती आकार रूपये ११९.०० पैसे यांसी चतु:सिमा -

पुर्वेस - भुखंड क्रमांक २६ ची मिळकत
पश्चिमेस - ७.५० मिटर रूंदीचा कॉलनी रोड
दक्षिणेस - भुखंड क्रमांक २२ ची मिळकत
उत्तरेस - भुखंड क्रमांक २० ची मिळकत

ड.सर्व्हे नंबर ८/२ब/२२ यांसी भुखंड क्रमांक २२ यांसी क्षेत्र १९८.०० चौ.मी यांसी बिनशेती आकार रूपये ११९.०० पैसे यांसी चतु:सिमा -

पुर्वेस - भुखंड क्रमांक २५ ची मिळकत
पश्चिमेस - ७.५० मिटर रूंदीचा कॉलनी रोड
दक्षिणेस - भुखंड क्रमांक २३ ची मिळकत
उत्तरेस - भुखंड क्रमांक २१ ची मिळकत

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 • NASIK-3 •

नसन-३

दस्त ८९५ /२०१३

४—३३



इ.सर्व्हे नंबर ८/२ब/२३ यांसी भुखंड क्रमांक २३ यांसी क्षेत्र २२९.५० चौ.मी यांसी बिनशेती आकार रूपये १३८.०० पैसे यांसी चतु:सिमा -

पुर्वेस – भुखंड क्रमांक २४ ची मिळकत

पश्चिमेस - ७.५० मिटर रूंदीचा कॉलनी रोड

दक्षिणेस - ७.५० मिटर रूंदीचा कॉलनी रोड

उत्तरेस – भुखंड क्रमांक २२ ची मिळकत

येणेप्रमाणे चतु:सिमेतील भुखंडाच्या मिळकती जलतरू, काष्टपाषाण, निधिनिक्षेप, तंदगभुत वस्तुंसह तसेच मंजूर अभिन्यासातील कॉलनी रोड व ओपन स्पेस वापरण्याचे हक्कांसहची भुखंडाच्या मिळकती दरोबस्त (यापुढे लिहून घेणार यांचा उल्लेख तुम्ही, लिहून देणार यांचा उल्लेख आम्ही व मिळकतीचा उल्लेख सदर /उपरोक्त मिळकत असा करण्यात आला आहे.)

०२) वर कलम १अ ते १इ यांत वर्णन केलेल्या भुखंड क्रमांक १९ ते २३ च्या मिळकती आम्ही दिनांक २८/१२/२०१२ रोजी श्री कैलास मधुकर पाटील यांचेकडून खरेदी घेतल्या असून सदरचे खरेदीखत मे. सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-२ नासिक-५ यांचे कार्यालयात दस्त अनुक्रमांक ११०२२ अन्वये नोंदविलेला असून सदर भुखंड मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डला मालक व कब्जेदार सदरी आमचे नावाची नोंद नंबर २९६६९ अन्वये दाखल झाले आहेत. अशारितीने आम्हांस मालक या नात्याने सदर मिळकतींची विक्री विल्हेवाट करण्याचा अथवा सदर भुखंडाच्या मिळकती विकसित करणेसाठी देणेचा हक्क व अधिकार प्राप्त झाला आहे.

०३) आम्हांस उपरोक्त भुखंडाच्या मिळकतीमधे आर.सी.सी. पध्दतीने नविन रोहाऊसेस बांधावयाची इच्छा आहे. परंतु बांधकाम करण्यासाठी आमचेकडे पुरेसा वेळ व निधी नसल्याने तसेच आम्हांस बांधकाम क्षेत्रातील अनुभवही नसल्यामुळे आम्ही वर वर्णन केलेली मिळकत विकसित करणेसाठी डेव्हलपरला देणेचे ठरविले. तुम्ही स्थावर मिळकतींची विकसनाची कामे करतात याची आम्हांस माहिती असल्याने आम्ही तुमची भेट घेतली व उपरोक्त मिळकतीचे विकसना संबंधी तुमचेशी चर्चा केली. तुमचे व आमचे दरम्यान मिळकतीचे विकसनाकामी चर्चा होऊन व्यवहाराबाबत वाटाघाटी सफल झाल्याने आम्ही उपरोक्त मिळकत खालील अटी व शर्तीवर तुम्हांस विकसित (डेव्हलप) करणेसाठी देण्याचे ठरवुन तुमचे लाभात हा मिळकत विकसित करणेचा करारनामा लिहून दिला आहे.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-3

नसन - ३
दस्त क्र. ७२५/२०११
५ — ३३



०४) उपरोक्त भुखंडाच्या मिळकती मे.जिल्हाधिकारी सो. नासिक यांचेकडील आदेश क्र. मशा/कक्ष-३/बि.शे.प्र.क्र.-४/३०९/२००१ दिनांक २१/०२/२००२ अन्वये बिनशेतीकडे वर्ग झाल्या असून उपरोक्त मिळकतींचा अभिन्यास मा. सहाय्यक संचालक नगररचना नासिक महानगरपालीका नासिक यांचेकडील पत्र क्रमांक जा. नं. / नगररचना विभाग / अंतिम /१४७ (पंचवटी) दिनांक १४/२/२००३ अन्वये अंतिम मंजूर झालेला आहे.

०५) उपरोक्त मिळकतीमधे करावयाचे नियोजित बांधकामाचा नकाशा तुम्ही नासिक महानगरपालीका नासिक यांचे संबंधीत कार्यालयाकडून मंजूर करून घेण्याचा आहे. उपरोक्त भुखंड मिळकतीमधे नासिक महानगरपालिकेचे मंजूर बिल्डींग प्लॅन नुसार तुम्ही आर. सी.सी. पध्दतीने इमारतीचे बांधकाम करावयाचे आहे.

०६) आम्ही तुम्हांस उपरोक्त भुखंड मिळकतीमधे बांधकाम करण्याचा आणि त्याची विक्री करण्याचा जो कायमस्वरूपी हक्क दिला आहे त्याचा मोबदला म्हणून तुम्ही नियोजीत रोहाऊसेस मधील आम्हांस सदर जागेमध्ये ४७ टक्के म्हणजेच ७७०६ चौरस फुट म्हणजेच ७१५.९० चौ.मी. बांधकाम देणार असून तळ व पहिले मजल्यावरील रोहाऊस क्रमांक ०३, ०५, ०७, ०९, ११ १३ चे प्रत्येकी भुखंडाचे क्षेत्र ५७.८५ चौ.मी. म्हणजेच ३४७.१० चौ.मी. व रोहाऊस क्रमांक १५ चे भुखंडाचे क्षेत्र ७७.९० चौ.मी.

तसेच रोहाऊस क्रमांक ०२ मध्ये तुम्ही आम्हांस ५६६ चौरस फुट बांधकाम म्हणजेच ५२.५८ चौरस मिटर देणार असून त्याचे भुखंडाचे क्षेत्र ३२.४२ चौ.मी. असे एकुण भुखंडाचे क्षेत्र ४५७.४२ चौ.मी देणार आहांत तरी रोहाऊस क्रमांक ०३ कामी येणा-या निव्वळ मिळकतीवरील इतर खर्च,शासकिय -निमशासकीय कर व तुम्हांस दिलेले रिफंडेबल सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम रूपये २,००,०००/- वजा जाता जो मोबदला येईल तो आमचे हिश्शेप्रमाणे (लिहून देणार)आम्हांस देणेचे मान्य केले आहे.(सोबत जोडलेल्या बिल्डींग प्लॅन मध्ये लाल रेषेने दर्शविलेले रोहाऊस आम्हांस देण्याचे आहे)

तसेच बांधकामासाठी भविष्यात जर बोअरवेल करण्याची गरज भासली व जर आमचे दिलेल्या हिश्यात आल्यास त्यासाठी लागणारा बोअरवेलचा संपूर्ण खर्च आम्ही तुम्हांला देण्याचे मान्य व कबूल केले आहे व बोअरवेल आमचे हिश्यास आल्यास त्याचा वापर करण्याचा त्याच रोहाऊस धारकांस करण्याचा अधिकार राहील व त्या अन्वये

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-3 *

नसन-३
दस्त क्र. ७९५ /२०१६
६ — ३३



तुम्हांस मिळणा-या मोबदल्याचे रक्कमेशी आमचा कोणताही सबंध राहणार नाही व त्यांस आम्ही कोणतेही प्रकारची हरकत घेणार नाही.

०७) आम्हांस मोबदल्यापोटी द्यावयाच्या रोहाऊसचा कबजा तुम्ही करारनामा नोंदविलेपासुन चोविस महिने मुदतीत देण्याचे मान्य केले आहे. आम्हांस रोहाऊसमधे तुम्ही ज्या सुखसुविधा उपलब्ध करून देणार आहात त्याचा तपशिल या कराराचे परिशिष्टांत नमुद करण्यात आलेला आहे.

तुम्ही बांधकाम करणार असलेल्या तुमचे मालकीच्या नियोजीत रोहाऊस क्रमांक ०१, ०२, ०४, ०६, ०८, १०, १२, १४ व १६ मध्ये लागणारे स्वंतत्र विजेचे व स्वंतत्र महानगरपालीकेचे नळाचे कनेक्शन रोहाऊस धारकांना ताबा देणेपर्यंत मिळवून देणेचे आम्ही मान्य केले असून त्याकामी लागणारा खर्च प्रत्येकी एका रोहाऊससाठी विज कनेक्शनसाठी रक्कम रूपये २०,०००/- व नळ कनेक्शनसाठी रक्कम रूपये १०,०००/- असे एकूण रक्कम रूपये २,७०,०००/- तुम्ही देण्याचे मान्य केले आहे. यदाकदाचित आम्ही तुम्हांस कबूल केलेले विज व नळाचे कनेक्शन देणेसाठी विलंब झाल्यास तुम्ही तुमचे खर्चाने विज व नळाचे कनेक्शन घ्यावे व त्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च आम्ही तुम्हांस विनातक्रार दयावयास बांधील आहोत त्याबाबत आम्ही कोणतीही सबब सांगणार नाही.

तसेच आमचे मालकीच्या रोहाऊस क्रमांक ०३, ०५, ०७, ०९, ११, १३ व १५ बाबत आम्ही मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, सर्व्हीस टॅक्स वॅटची व इतर कोणतेही अन्य करांची रक्कम भरावयाची आहे. त्याबाबत तुमचेवर(लिहून घेणार) कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

तसेच तुम्हांस (लिहून घेणार) ५३ टक्के म्हणजेच ८६८९ चौरस फुट म्हणजेच ८०७.२२ चौरस मिटर तुम्हांस तळ व पहिले मजल्यावरील रोहाऊस क्रमांक ०१ यांसी भुखंडाचे क्षेत्र ११३.६५ चौ.मी. व रोहाऊस क्रमांक ०४, ०६, ०८, १०, १२, १४, यांसी प्रत्येकी क्षेत्र ५७.८५ चौ.मी. म्हणजेच ३४७.१० चौ.मी. देणेचे आहे. तसेच रोहाऊस क्रमांक १६ चे भुखंडाचे क्षेत्र ७७.९० चौ.मी.

तसेच रोहाऊस क्रमांक ०२ मध्ये तुम्हांस ४४४.०० चौरस फुट बांधकाम म्हणजेच ४१.२५ चौरस मिटर दिले आहे त्याचे भुखंडाचे क्षेत्र २५.४३ चौ.मी. असे एकूण भुखंडाचे क्षेत्र ५६४.०८ चौ.मी देणार आहोत तरी रोहाऊस क्रमांक ०२ कामी येणा-या निव्वळ मिळकतीवरील इतर खर्च, आमचे हिश्यातील रक्कम वजा जाता येणारा जो मोबदला येईल त्यावर आम्ही अधिकार सांगणार नाही असे आम्ही

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 • NASIK-3 • सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक ३

नसन-३
दस्त क्र. ८१९५ /२०१६
७-33



मान्य व कबूल केले आहे. तसेच तुमचे मालकीच्या रोहाऊसबाबत तुम्ही मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, सर्व्हीस टॅक्स व वॅटची रक्कम भरावयाची आहे. त्याबाबत आमचेवर कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

०९) तुम्ही आम्हांस रक्कम रुपये २,००,०००/- अक्षरी रूपये दोन लाख मात्र रिफंडेबल सिक्युरिटी डिपॉझिट अन्वये दिले असून सदरची रक्कम तुम्ही आमचे हिश्याप्रमाणे मिळणार असलेल्या रोहाऊस क्रमांक ०२ च्या विक्रीतुन मिळणा-या रकमेतून वजा वाट करून उर्वरित रक्कम आम्हांस द्यावयाची आहे.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-3

१०) तुम्हांस व आम्हांस मिळणा-या रोहाऊस क्रमांक ०२ विक्री करण्याचा तसेच त्याचा मोबदला स्विकारण्याची जबाबदारी तुमचेवर असेल व येणा-या मोबदल्यात ५६.०४ टक्के हिस्सा तुम्ही आम्हांस इतर खर्च वजा जाता अदा करावयाचा आहे.

११) तुम्ही संपूर्ण रोहाऊसचे बांधकाम उत्तम दर्जाचे तसेच बिल्डींग प्लॅन मध्ये दर्शविल्या प्रमाणे करावयाची जबाबदारी स्विकारली आहे. आम्हांस रोहाऊसमधील अन्य रोहाऊस धारकांसमवेत सर्व सुखसोयी, सामायिक जागा, वापरण्याचा हक्क राहिल. आमचा भुखंडाचे तळजागेवर आम्हांस मिळणा-या बांधकामाचे हिश्शेराशी नुसार अन्य रोहाऊस धारकांसह मालकी हक्क राहिल. आम्हांस द्यावयाच्या बांधकामा व्यतिरिक्त उर्वरित सर्व रोहाऊसचे बांधकाम तुमचे मालकीचे राहिल व त्या बांधकामाची व बांधकामाचे हिश्शेराशीनुसार ५३ टक्के येणा-या तळजागेची विक्री अन्य त-हेने विल्हेवाट करण्याचा तुम्हांस पुर्णपणे हक्क व अधिकार राहिल. त्या गोष्टीशी आमचा कोणताही संबंध राहणार नाही. तुमचे ५३ टक्के बांधकामाचे विक्रीपासून मिळणारी संपूर्ण रक्कम तुम्हीच घ्यावयाची आहे. त्या रकमेवर आम्ही हक्क सांगणार नाही.

१२) रोहाऊसेस मधील सर्व रोहाऊस धारकांची मिळून स्थापन्यात येणा-या गृहनिर्माण संस्थेचे अथवा असोसिएशन ऑफ अपार्टमेंट होल्डर्स चे सभासद होण्याचे व त्याचे स्थापनेसाठी लागणारा खर्च हिश्शेराशीनुसार देण्याचे आम्ही मान्य व कबूल केले आहे. तुम्ही गृहनिर्माण संस्थेची अथवा असोसिएशन ऑफ अपार्टमेंट होल्डर्सची स्थापना केल्यानंतर त्या संस्थेचे लाभात आम्ही भुखंड मिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवून देवू. भुखंड मिळकतीचे खरेदीखता कामी लागणारा खर्च सर्व सभासदांनी हिश्शेराशीनुसार करावयाचा असल्याने आमचे हिश्यास येणा-या खर्चाची रक्कम देण्याचे आम्ही मान्य केले आहे.

नसन-३
दस्त क्र. ८५ /२०१
८—३३

८

१३) तुम्ही उपरोक्त भुखंड मिळकतीमधे करारनामा नोंदविलेचे तारखेपासुन चोविस महिने मुदतीत रोहाऊसचे बांधकाम तुम्ही तुमचे पदरखर्चाने पुर्ण करावयाचे आहे. बांधकाम व महानगरपालीकेकडून इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला (कंम्प्लीशन सर्टीफिकेट) तुम्ही आम्हांस देण्याचे आहे ही या कराराची महत्वाची अट व शर्त आहे. मात्र कोणतेही कायदेशिर अथवा तांत्रिक अडचणीमुळे, दैवि, नैसर्गिक प्रकोपामुळे, संप, दंगल, बांधकाम साहित्याचा तुटवडा वगैरे गोष्टींमुळे बांधकाम करता येणे शक्य झाले नाही तर जितक्या कालावधीसाठी बांधकाम बंद राहिल तितका कालावधी बांधकाम पुर्ण करणेसाठी चर्चा करून मुदत वाढवून देण्याचे आम्ही मान्य केले आहे. तसेच चोविस महिने मुदतीत बांधकाम पुर्ण न झाल्यास प्रति दिन तिन हजार रूपये तुम्ही देण्याचे मान्य व कबूल केले आहे.

१४) वर नमूद केलेल्या भुखंड मिळकतीवर सदर मिळकती विकसित होईपावेतो तुमचा कबजा राहील तसेच सदर मिळकतीचे विकसनाचे कामे संपूर्ण पुर्तता होईपावेतो व तसेच महानगरपालीकेचे इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला (कंम्प्लीशन सर्टीफिकेट) मिळेपर्यंतचे व त्यानंतर देखील सदर मिळकती आम्ही इमारतीचे बांधकाम पुर्ण होईपावेतो कायम सतत निर्बंध ठेवावयाची आहे.

१५) वर नमूद केलेल्या करारनाम्यान्वये बांधकाम पुर्ण होईपावेतो तेथील कामांची कामगाराची किंवा अपघाताची सर्वस्वी जबाबदारी तुमची राहील त्याचेशी आमचा कांहीही एक संबंध राहणार नाही. तसेच मिळकतीचे विकसन करतेवेळेस तुम्ही कोणाही व्यक्ती बरोबर संस्थे बरोबर,ठेकेदारा बरोबर जे जे करारनामे करतील त्याची कोणतीही आर्थिक जबाबदारी आमचेवर राहणार नाही त्या करारनाम्याशी आमचा कोणताही संबंध राहणार नाही.

JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-3

१६) तुम्ही आम्हांस मोबदल्यापोटी देणार असलेल्या ४७ टक्के रोहाऊस व्यतिरिक्त इतर बांधीव क्षेत्र त्रयस्थ इसमांना विक्री करणेकामी प्रचलित बाजाराचे चालीरितिप्रमाणे चटई क्षेत्रावर बांधीव क्षेत्राची टक्केवारी जोडतील त्याचेशी आमचा कोणताही संबंध राहणार नाही अथवा ते सदर टक्केवारीचा त्यांना मोबदल्यापोटी मिळणा-या रोहाऊसचे बांधीव क्षेत्राची तुलना करणार नाहीत व सदर दस्तात नमूद बांधीव क्षेत्रा व्यतिरिक्त जादा बांधीव क्षेत्राची मागणी करणार नाही.

१७) वर नमूद केलेल्या मिळकती संदर्भात विकसन करणेकामी तसेच आम्हांस मोबदल्यापोटी देण्यात येणा-या रोहाऊस व्यतिरिक्त बांधीव भाग विक्री करणेकरीता तुम्हांस मुखत्यारपत्र लिहून तसेच दस्त एकत्रपणे वापरण्याचे हक्क अधिकार दिलेले आहेत. विकसन करतेवेळी

नसनं-३
दस्त क्र. ८७९५ /२०१६
१६/३३



व विक्री करतेवेळी आमची प्रत्यक्ष हजर राहण्याची आवश्यकता असू नये याकरीता तुम्हांस अलाहिदा या करारनाम्याचे अनुषंगाने तुमचे लाभात मुखत्यारपत्र लिहून व नोंदवून दिलेले आहे त्याचा वापर करून तुम्ही सदरची कामे पार पाडावयाची आहे.

१८) सदर मिळकतीवर बांधून तयार होणा-या रोहाऊसेसला आशिर्वाद रोहाऊसेस असे नांव ठेवावयाचे आहे ही बाब आम्हांस मान्य व कबूल आहे

१९) सदर रोहाऊसचे बांधकाम हे सर्वस्वी तुम्हीच पुर्ण करावयाचे आहे कोणासही हस्तांतर करण्याचा अधिकार राहणार नाही त्यांच्या पश्चात त्यांचे वाली वारसांनी पुर्ण करावयाचे आहे त्याचा भंग झाल्या बाबतचे सर्व निर्णय घेण्याची सर्व अधिकार आमचेवर असतील.

२०) तुम्हांस मिळकत विकसित करणेसाठी व बांधकाम, खुली जागा हस्तांतरीत करणेसाठी व विकसनाचे अन्य संबंधीत कामांसाठी आमच्या ज्या ज्या अर्जावर, कागदपत्रांवर व दस्तऐवजांवर सह्यांची/संमत्यांची गरज असेल त्या त्या कागदपत्रांवर / दस्तऐवजांवर/अर्जावर आम्ही विनातक्रार व विनाविलंब सह्या/ संमत्या देवू. सदर व्यवहाराकामी आमचे इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टीफीकेटची आवश्यकता लागल्यास आम्ही आमचे इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टीफीकेट व इतर अन्य कोणतेही टॅक्स क्लिअरन्स सर्टिफकेट आणून देण्याची हमी स्विकारली आहे.

२१) तुम्ही करणार असलेल्या भुखंडाचे विकसनाकामी कोणीही इसमाने/ इसमांनी कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास/अडथळा केल्यास त्याचे संपुर्ण निवारण आम्ही आमचे पदरखर्चाने व आमचे जबाबदारीवर करून देवू. हरकती/अडथळ्यांचे निवारणासाठी आठ दिवसांचे पेक्षा जादा कालावधी लागल्यास जितका जादा कालावधी लागेल तितक्या कालावधीसाठी रोहाऊसचे काम पुर्ण करण्यासाठी ठरलेली मुदत वाढवुन देण्याचे आम्ही कबुल व मान्य केले आहे.

२२) उपरोक्त भुखंड मिळकती बाबतचे सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती महसुल कार्यालयातुन, भुमी अभीलेख कार्यालयातुन, न्यायालयातुन काढणेसाठी अर्ज करणे, नक्कल शुल्क भरणे, नकला स्विकारणे तसेच आवश्यकतेनुसार मिळकतीची मोजणी करून मिळकतीच्या हद्दी तुम्ही कायम करून घ्यावयाचे आहे.

२३) उपरोक्त भुखंडाचे मिळकतीत बांधकाम करणेसाठी भुखंड मिळकतीचे एकत्रिकरण करणे, नियोजित इमारतीचे बांधकाम नकाशे तयार करणे, ते मंजूरीसाठी नासिक महानगरपालीकेच्या कार्यालयात दाखल करणे, बेटरमेंट चार्जेस, डेव्हलपमेंट चार्जेस व इतर शुल्क भरणे,

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR (CLASS-2) NASIK-3

नसन-३
सक्र. ८९८५ /२०१२
१० — ३०



नाशिक महानगरपालीकेच्या संबंधीत अधिका-यांनी प्लॅनमध्ये दुरुस्ती सुचविलेस त्यानुसार प्लॅनमध्ये दुरुस्ती करणे,आवश्यक असलेले कागदपत्र, प्रतिज्ञापत्र, डिक्लरेशन दाखल करणे, नासिक महानगरपालिकेने मंजूर केलेल्या बांधकाम नकाशानुसार इमारतींचे बांधकाम पुर्ण करणे, बांधकाम पुर्णत्वाचा व वापर करणे बाबतचा दाखला मिळविणे, बांधीव भागांची व त्यांचेशी संलग्न खुल्या जागेची विक्री करणे ही कामे लिहून घेणार यांनी करावयाची आहे.

२४) उपरोक्त भुखंड मिळकतीत तुम्ही बांधकाम केल्यानंतर त्यांची मालकी हक्काने तळ जागेची व बांधकामाची विक्री करणेसाठी अथवा हस्तांतर करणेसाठी इच्छूक ग्राहकांबरोबर बोलणी करणेचा, त्यासंबंधी करार-मदार करणेचा, खरेदीखत/ डिड ऑफ अपार्टमेंट व अन्य दस्तऐवज लिहून देणेकामी अधिकार पत्र स्वंतत्र लिहून दिले आहे. तुम्ही ज्या इसमां बरोबर बांधकाम विक्री करणेचा करार कराल त्या इसमांचे लाभात आम्ही अथवा आमचे मुखत्यार तुमचे सुचनेनुसार खरेदीखत लिहून व नोंदवून देतील व खरेदीखताचे वेळी भुखंड मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मालकीहक्काने कायम करुन देतील. उपरोक्त भुखंडाच्या मिळकती विकसित करणेसाठी इच्छूक विकसन कर्त्यास देणेचा त्याकामी विकसन करारनामा व मुखत्यारपत्र लिहून व नोंदवून देणेचा, किमतीपोटी रक्कम स्विकारणेचा तुम्हांस हक्क राहील. सदर भुखंड मिळकतीतील बांधकामाचे व तळजागेचे विक्रीतुन तुम्हांस मिळणा-या रकमेवर सर्व सरकारी कर भरणेची जबाबदारी सर्वस्वी तुमची राहील. उपरोक्त भुखंड मिळकत विकसित करतांना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी तुमची राहील.

२५) उपरोक्त भुखंड मिळकत विकसित करणेसाठी ५३ टक्के बांधकाम व तळजागा हस्तांतरीत करणेसाठी तुम्हांस मिळणारा नफा हा तुमचाच राहील व तुम्हांस मिळणा-या नफ्यावरील आयकर व इतर सर्व कर भरण्याची जबाबदारी ही तुमची राहील त्याचेशी आमचा कोणताही संबंध राहणार नाही.

२६) उपरोक्त भुखंड मिळकत विकसित करणेसाठी ४७ टक्के बांधकाम व तळजागा हस्तांतरीत करणेसाठी आम्हांस मिळणारा नफा हा आमचाच राहील व आम्हांस मिळणा-या नफ्यावरील आयकर व इतर सर्व कर भरण्याची जबाबदारी ही आमची राहील त्याचेशी तुमचा कोणताही संबंध राहणार नाही.

२७) उपरोक्त भुखंड मिळकती मधील बांधकाम खरेदीदारांची मिळून गृहनिर्माण संस्था,कंपनी,असोसिएशन ऑफ अपार्टमेंट ओनर्सची स्थापना करणेसाठी सर्व कायदेशिर गोष्टींची पुर्तता करुन देणे, डिड

नसन - ३
दस्त क्र. ८९२५/२०१३
११ — ३३



ऑफ डिक्लरेशन (घोषणापत्र)तयार करणे, त्यावर आमचे वतीने सह्या करून ते मे. सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-२ नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून घेणे, स्थापन होणा-या कंपनी / असोसिएशनचे /गृहनिर्माण संस्थेचे लाभात तळ जागेचे खरेदीखत लिहून व नोंदवून देणे.

२८) वर वर्णन केलेल्या भुखंड मिळकतीचे विकसनाकामी तुम्ही कोणत्याही शासकिय, निमशासकीय कार्यालयांकडे आमचे नांवाने कोणतीही रक्कम अगर ठेव जमा (डिपॉझीट) केल्यास ती रक्कम अगर ठेव परत घेण्याचा तुम्हांस अधिकार राहिल.

२९) उपरोक्त भुखंड मिळकतीत बांधकाम करणेसाठी तुम्हांस व तुमचे अधिकारी प्रतिनिधी, नातेवाईक, कामगार, आर्किटेक्ट, इंजिनिअर्स व इतर संबंधीत इसमांना सदर मिळकतींवर जाण्याचा, तेथे थांबण्याचा मोजणी करून कंपाऊंड करण्याचा, तेथे तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम करण्याचा, मंजूर बिल्डींग प्लॅनप्रमाणे पक्के बांधकाम करण्याचा,स्वत:चे नावाचा बोर्ड लावण्याचा हक्क व अधिकार राहील. सदरची कामे करण्यासाठी आम्ही तुम्हांस जनरल मुखत्यारपत्र दिले असून लायसेन्सी म्हणून मिळकतींचा कबजा दिला आहे.या कराराप्रमाणे भुखंडाची मिळकत विकसित करणेसाठी मिळकतींवर जी जी कामे करावी लागतील ती ती सर्व कामे करण्याचा तुम्हांस हक्क राहील व त्या कामापासुन निर्माण होणा-या कायदेशिर बाबी देखील तुमचेवर बंधनकारक राहतील.

३०) आम्हांस ४७ टक्के मालकी हक्काने द्यावयाचे रोहाऊसेस तळ जागा व्यतिरिक्त उर्वरित बांधकामाची, खुल्या जागेची मालकी हक्काने अगर अन्य त-हेने विक्री करण्याचा व त्या विक्री पासून मिळणारी संपुर्ण रक्कम घेण्याचा तुम्हांस अधिकार राहील. मिळकतीच्या विक्रीतून जमा होणा-या रकमेपैकी कोणतीही रक्कम मागण्याचा आम्हांस अधिकार राहणार नाही. आम्हांस द्यावयाचे बांधकाम वगळता उर्वरित बांधकाम कशा पध्दतीने हस्तांतरीत करावयाचे याबाबतचे सर्व निर्णय घेण्याचा तुम्हांस अधिकार राहील. त्यामध्ये आम्ही कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही अगर दखल देणार नाही अशी आम्ही हमी दिली आहे.

३१) आम्हांस द्यावयाचे बांधकामाचे क्षेत्र वगळता राहिलेल्या बांधकामाची विक्री करण्याबाबत जाहिरात करण्याचा बुकिंग सुरू करण्याचा, इच्छुक खरेदीदारांबरोबर जरूर ते सर्व करारनामे/दस्तऐवज करण्याचा, बांधकामाचे किंमतीपोटी रक्कम स्विकारण्याचा तुम्हांस हक्क राहिल. मात्र तुम्ही लिहून देणार असलेल्या करारनाम्या संबंधीची

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 * NASIK-3 *

अथवा करणार असलेल्या व्यवहाराची कोणतीही आर्थिक जबाबदारी आमचेवर राहणार नाही याची स्पष्ट जाणीव तुम्हांस देण्यात आली आहे.

३२) आम्ही वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत खालील गोष्टी जाहीर करतो व खात्रीने सांगून भरवशाने लिहून देतो की,

(अ) वर कलम १अ ते १ड मध्ये वर्णन केलेल्या मिळकती आमचे प्रत्यक्ष कबजे वहिवाटीत व उपभोगात आहेत. त्यामध्ये अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध नाही.

(ब) आम्ही उपरोक्त भुखंडाच्या मिळकती यापुर्वी कोणासही, कोणत्याही प्रकाराने हस्तांतरीत केलेल्या नाहीत अगर तसा तोंडी अथवा लेखी सौदा केलेला नाही. सदरच्या मिळकती आम्ही गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, साठेखत करारनामा, अगर अन्य कोणत्याही दस्तऐवजाने जडजोखमीत गुंतविलेल्या नाहीत. मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर चार्ज नाही. मिळकत अव्वल जप्तीने अगर इतर जप्तीने जप्त झालेली नाही. आम्ही मिळकती संदर्भात कोणत्याही कोर्टात, शासकीय वा निमशासकीय कार्यालयात कोणत्याही प्रकारचे अंडर टेकिंग दिलेले नाही. सदर मिळकती बाबत हद्दीचा वाद, क्षेत्रासंबंधी वाद, मालकी हक्का संबंधी वाद, हिश्शासंबंधी वाद, रस्त्यासंबंधी वाद नव्हता व नाही.

(क) सदर मिळकती संपादित, अधिग्रहण अथवा राखीव करण्यांत आलेली नाही, किंवा त्याबाबत आम्हांस आजपावेतो नोटीस आलेली नाही.

(ड) उपरोक्त भुखंड मिळकतीबाबत ॲडव्होकेट उमेश त्र्यंबकराव [illegible]ळ यांचे मार्फत दिनांक ०१/१०/२०१६ रोजी दैनिक देशदूत [illegible]मान पत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द केली होती. उपरोक्त भुखंडाची मिळकत पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे. मिळकतीचे टायटलमध्ये कोणत्याही प्रकारचा दोष आढळून आल्यास अगर या व्यवहारांस कोणीही हरकत घेतल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखर्चाने करून देवू तरीही निवारण न झाल्यास तुमचा बांधकामापोटी तसेच अन्य इतर सर्व खर्चासहीत तुम्हांस देणेचे कबूल केले आहे. तसेच कांही वाद उत्पन्न झाल्यास नेमलेल्या लवादाने घेतलेला निर्णय तुमचे व आमचेवर बंधनकारक राहील त्याबाबत तुम्हांस तोषिस लागू देणार नाही.

३३) तुमचे व आमचे दरम्यान बांधकामाचे दर्जाबाबत मतभेद झाल्यास त्याबाबत संबंधीत आर्कीटेक्टने दिलेला निर्णय अंतिम राहील

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR • NASIK-3 •

नसन-३
क्र. ९५५ (२५)
९३...२३



व तो निर्णय दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक राहील. आर्कीटेक्टचे निर्णयाविरूध्द कोणत्याही पक्षास तक्रार करण्याचा अथवा एकमेकांविरूध्द न्यायालयात कारवाई करण्याचा अधिकार राहणार नाही.

३४) या करारात ठरलेल्या अटी व शर्तीप्रमाणे डेव्हलपमेंटचे काम पुर्ण होईपावेतो आम्ही मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण करणार नाही अगर करार पुर्ण करणे अशक्य होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही.

३५) आमचे कृत्यामुळे तुम्हांस डेव्हलपमेंटचे काम पुर्ण करता येणे शक्य झाले नाही व त्यामुळे तुमचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करून देण्याची जबाबदारी आमची राहील.

३६) मंजूर बिल्डींग प्लॅन नुसार बांधकाम करण्यामधे काही अडचणी निर्माण झाल्यास त्या दुर करणेसाठी बिल्डींग प्लॅन रिव्हाईज करण्याचा व तो पुन्हा मंजूर करून घेण्याचा तुम्हांस अधिकार राहिल. मात्र बिल्डींग प्लॅन रिव्हाईज करतांना आम्हांस मोबदल्यापोटी मिळणार असलेल्या बांधकामाचे क्षेत्रामधे व स्थानामधे कोणताही बदल होणार नाही याची दक्षता तुमचेवर बंधनकारक आहे.

३७) वर वर्णन केलेल्या मिळकती संबंधाने आकारण्यात आलेल्या करांच्या रकमेचा आजपावेतोचा भरणा आम्ही करून देवू. आजपासून पुढील करांच्या रकमेचा भरणा तुम्ही करावयाचा आहे.

३८) प्रस्तुतचे डेव्हलपमेंट अॅग्रीमेंट कामी भरावी लागणारी मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क फी व इतर अनुषंगिक खर्च तुम्ही करावयाचा व सोसावयाचा आहे.

३९) उपरोक्त मुखंड मिळकतीचे विकसनाकामी व नियोजीत बांधकामाचे विक्री कामी जी कामे करावी लागणार आहेत ती कामे करणेसाठी आम्ही तुमचे लाभात आजरोजी अलहिदा जनरल मुखत्यारपत्र लिहून दिले आहे.

४०) तुम्ही नियोजीत इमारतीमधील आम्हांस देणार असलेल्या रोहाऊस व्यतिरिक्त उर्वरित रोहाऊसचे बांधकाम ज्या प्रतीचे (क्वालिटीचे) कराल त्याच प्रतीचे बांधकाम आम्हांस द्यावयाच्या रोहाऊसबाबत करावयाचे बंधन तुमचेवर आहे. बांधकामा बाबत किंवा बांधकामाचे दर्जाबाबत तुमचे व आमचे दरम्यान काही वाद निर्माण झाल्यास तो वाद मिटविण्यासाठी उभयतांनी लवादा मार्फत मिटविण्याचे बंधन तुमचेवर व आमचेवर राहील.

४१) उपरोक्त मुखंडाच्या मिळकतीवर तुम्ही जी नियोजीत रोहाऊसेस बांधणार आहांत त्यानुसार संभाव्य बांधीव मिळकतीचे

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 * NASIK-3 *

नक्कल – ३
क्रमांक ७१९५/२०१४
१४ – ३३



खरेदीदार ज्या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतील त्या संस्थेस सदर विक्री करणार असलेली मिळकत तारण,गहाण, देण्यास आमची संमती राहील मात्र त्या कर्जाची व्याजासह परतफेड करण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील त्याचेशी आमचा कांही एक सबंध राहणार नाही.

४२) उपरोक्त भुखंड मिळकतीचे विकसन करारनामा नोंदविले पश्चात मिळकतीचे रेकॉर्डला इतर हक्कात तुमचे नावाची विकसनकर्ता म्हणून नोंद दाखल होण्यास आमची संमती राहील त्याकामी आवश्यक अर्ज, नोटीस फॉर्मवर आम्ही स्वाक्ष-या करावयाचे मान्य व कबूल केले आहे त्याकामी लागणारा खर्च हा तुम्ही तुमचे पदरखर्चाने करावयाचा व सोसावयाचा आहे.

४३) तुम्हांस भुखंड मिळकतीत बांधकाम करण्याचे हक्क आम्ही तुम्हांस दिले असल्याने बांधकाम पुर्ण करणेसाठी करारनाम्यात नमूद केलेल्या अधिकाराचे कार्यकक्षेत राहून तुम्ही अधिकाराचा वापर करुन ज्या ज्या गोष्टी कराल त्या सर्व आमचेवर बंधनकारक राहतील.

४४) तुम्ही आम्हांस आमचे हिश्याप्रमाणे दिलेले बांधकाम सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणेच असेल ही बाब आम्हांस मान्य व कबूल आहे. तसेच विकसक यांनी विकसनाकरीता कोणतेही प्रकल्प कर्ज (प्रोजेक्ट लोन) अथवा भुखंड गहाण ठेवण्याचा विकसकाला अधिकार राहणार नाही.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR • NASIK-3 •

४५) उपरोक्त भुखंडाची मिळकत आम्ही तुम्हांस विकसित करणेसाठी दिलेली असल्याने विकसनाची व विक्रीची कामे पुर्ण होईपावेतो तुम्ही व आम्ही एकमेकाविरुध्द कोणतेही प्रकारची कायदेशीर कारवाई करणेची नाही. तसेच तुमचे व आमचे दरम्यान भविष्यात कोणत्याही कारणास्तव वाद उत्पन्न झाल्यास त्याचे निवारण दोन्ही पक्षकारांनी मान्य असलेल्या लवादामार्फत करावयाचे आहे. लवादाने दिलेला निर्णय दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक राहील. सदर करारनामा केल्यामुळे तुम्ही व आम्ही एकमेकांचे भागीदार होत नाही किंवा एकमेकांचे प्रतिनिधी एजंट होत नाही व तसा उद्देश तुमचा व आमचा नाही. तुमचे व आमचे हक्क व जबाबदा-या नमूद करणेसाठी सदरचा करारनामा करण्यात आला आहे.

४६) तुम्ही भुखंड मिळकतीचे विकसनाचा संपूर्ण मोबदला ४७ टक्के बांधकाम आम्हांस देणार असल्याने सदरचा करारनामा व व्यवहार तडकाफडकी व एकतर्फी रद्द करणेचा व विकसनाची व विक्रीची कामे थांबविणेचा,तुमचे विरुध्द मे. न्यायालयाकडून मनाई हुकूम घेणार नाही. दैनिक वर्तमानपत्रात जाहीर नोटीस/खुलासा प्रसिध्द करुन अथवा वकीलामार्फत /स्वत:मार्फत नोटीस पाठवून सदरचा करारनामा

नसनं - ३
दस्त क्र. ८९८६ /२०१६
१९ / ३३



आम्ही रद्द करणार नाहीत.जरी भुखंड मिळकत मालक म्हणून आमचे नाव दिसून येणार असले तरी आम्हांस सदर भुखंड मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा लेख तुमचे व्यतिरिक्त इतर कोणचेही लाभात लिहून देणेचा अधिकार राहीलेला नाही. कोणत्याही कारणास्तव सदरचा करारनामा आम्हांस रद्द करावयाचा असल्यास त्यासाठी मे. कोर्टाचा अंतिम निर्णय मिळविल्यानंतरच करार रद्द करणेचा हक्क आम्हांस प्राप्त होईल.

४७) तुम्हांस विकसनाकरीता दिलेला प्रकल्प तुमच्या द्वारे कोणत्याही अन्य विकासकाला विकसनाकरीता देता येणार नाही असे तुम्ही मान्य व कबूल केले आहे.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-3 *

## परिशिष्ठ

१.इमारत ही आर.सी.सी.फ्रेम (साठा) पध्दतीने बांधली जाईल. कोणत्याही एका बेडरूम मध्ये व किचन मध्ये एक लॉफ्ट दिला जाईल.

२.इमारतीचे बांधकाम बाहेरील सहा इंच व आतील ४ इंच विटामधे केले जाईल.

३.रोहाऊसला बाहेरून सॅण्ड फेसड डबल कोट आणि आतून नेरू प्लॅस्टर असेल.

४ खिडकीला थ्री ट्रॅक ॲल्युमिनियम स्लायडिंग विंडो व मॉस्कीटो नेट सोबत विंडो सिल स्टिल ग्रे मार्बल मध्ये असेल तसेच बाहेरून एम.एस. सेफटी ग्रिल असेल

५. इलेक्ट्रीक फिकेशन कन्सील्ड पध्दतीचे तसेच २.५ पॉईटस् प्रमाणे असतील

६.सर्व रूमस्मध्ये २ बाय २ व्हेक्ट्रीफाईड (डबल चार्ज)टाईल्स असतील.

